॥श्री॥

# SUCCESS STORIES

**मनीष दाभोलकर**

आज पर्यंत Success Story सदरात उद्योग, व्यवसाय, नोकरी, इंडस्ट्री अशा क्षेत्रात नावलौकीक मिळविलेल्या तरुणांची कथा आपण वाचलीत. परंतु आज निसर्गाचा आघात झालेल्या आईची व तरुणपणातच विधवा झालेल्या नेत्राताई पाटकर- तेंडूलकर यांनी प्रतिकूल परिस्तिथीवर मात करून घेतलेल्या झेप ची success story चा उलगडा आम्ही करणार आहोत. संस्था या फक्त नफा कमविण्यासाठीच नसतात तर त्यातून आत्मीक समाधान, सामाजिक चळवळ, गुंतागुंतीच्या समस्या, आयुष्यभराचा वाटणारा मनस्ताप, अतिव दुख: कमी करण्यासाठी सुद्धा असतात. यांची खरोखर जाणीव झेप व नेत्राताईच्या मुलाखती मधून होते. संस्था नफा कमविल्यावर सामाजिक दायित्वासाठी त्यातील काही भाग दान (गरजेचे) असल्याने करतात. परंतु, झेप संस्थेने रोजगार तर निर्माण केलाच, नावलौकिक मिळविले, विशेष मुलाचे भविष्य साकार केले, पालकांना मानसिक आधार दिला, पुण्यात पहिलीच ''झेप संस्था'' उभाणाऱ्या, नेत्राताई अभिनंदनास पात्र आहेत. आजच्या success story मुळे सर्वानाच विशेष करून महिलांना परिस्थितीशी लढा देण्याचे विशेष सामर्थ्य प्राप्त होईल. यांची आम्हाला खात्री वाटते.

**१) तुमचे बालपण, माहेरचे नाव (कौटुंबिक परिस्थिती आई, वडील कुटुंबाविषयी) थोडक्यात माहिती द्या?**

माझे आजोबा व वडिल शशिकांत दाभोलकर ह्यांना नातेवाईक व मित्रमंडळी यांना मदत करणे तसेच त्यांना वेंगुर्ल्याहून मुंबईला आणून शिक्षण देणे हे सर्व जन्मापासून मी बघत असल्यामुळे गरजवंताला मदत करणे पहिल्यापासूनच माहित होते. आई शशिकला ह्या पूर्वाश्रमीच्या सामंत ह्यांनी गोवामुक्तीसंग्रामाचे दिवस असूनही प्रवाहाच्या विरुध्द जाऊन त्यांच्या वडिलांच्या मदतीने फोंडा येथे कष्टकरी लोकांच्या मुलांसाठी शाळा सुरु केली.



नेत्रा पाटकर तेंडूलकर

**२) तुमचे शालेय शिक्षण कॉलेज, बालपणीच्या आवडीनिवडी, कला, हौस व बालपणी एखादे पाहिलेले स्वप्नाविषयी?**

माझे वडिल युनियन बँकेत अधिकारी पदावर होते व आई शिक्षिका, असल्यामुळे माझे भाऊ व माझे बालपण तसे शिस्तीत वा आनंदात गेले. अंधेरी पश्चिम येथे मोक्याच्या ठिकाणी मी रहात होते व अंधेरी पूर्वेला माझे परांजपे विद्यालय येथे शालेय शिक्षण झाले. जवळच पार्ला पूर्व येथील डहाणूकर कॉलेज मध्ये वाणिज्य शाखेतील पदवी प्राप्त केली. पाककलेची आवड असल्यामुळे कॅडल रोड येथील कॅटरिंग कॉलेज येथे पाककलेचे शिक्षण घेतले. पाककलेत रुचीअसल्यामुळे त्याच्यातच पुढील करियर करावे अशी फार इच्छा होती.

**३) आपले लग्न कधी झाले? पती काय मुलाविषयी, सांगाल थोडक्यात, पुण्याला कशा आलात?**

पदवीप्राप्त झाल्यावर १९८८ साली तेंडोलीच्या विसापूरकर तेंडोलकरांच्या घरातील वास्तुविशारद केतन तेंडूलकर यांच्या कडून लग्नाची मागणी आल्यामुळे पाककलेत करीयर न करता लग्न झाले. केतन तेंडूलकर मुंबईत वास्तुविशारद म्हणून रहेजामध्ये नोकरी करत होते. पण त्यांना स्वतःचा व्यवसाय करायचा असल्यामुळे पुण्यात स्थलांतर केले. असे सर्व गुण्यागोविंदाने चालू असताना १९९० साली प्रेयसचा जन्म झाला. बाळ ३ महिन्याचे झाले व डॉक्टरांनी बाळाला सेरेब्रल पाल्सी ही अवस्था असल्याचे सांगितले त्यामुळे बाळाची वाढ सामान्य मुलांप्रमाणे होणार नाही हे सांगितले, हे सांगितल्यामुळे मोठा धक्का बसला. त्यावेळी पती केतन व माहेर वा सासरचे नातेवाईक मागे खंबीरपणे उभे राहिल्यामुळे धक्का पचवणे सोपे गेले.

**४) ऐन तरुणपणात पतीचे निधन झाले... लहान बाळ प्रेयस पदरात... नंतर प्रेयस हा वेगळा आहे आणि हा आजार नसून एक अवस्था आहे. असे समजल्यावर**

**आपल्यासमोर आव्हान व आपल्या भावना याविषयी. ...**

आपले बाळ वेगळे आहे हा आघात पचवते न पचवते तोच पतीचे निधन झाले. सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या माझ्यावर कोसळलेल्या संकटांमुळे त्या परिस्थितीला सामोरे जाण्याचे सामर्थ्य दिले. मी बाळाच्या वा स्वतःच्या भविष्याची काळजी वाहण्यासाठी आई-वडिल, नातेवाईक वा मित्र-मंडळींच्या सहाय्याने स्वतःला झोकून दिले. आपल्या मुलाला योग्य प्रशिक्षण मिळण्यासाठी त्यांनी रिहॅबिलीटेशन कौन्सिल ऑफ इंडिया, दिल्ली येथे स्पेशल एज्युकेशनचा कोर्स पूर्ण केला. मुलांना शिकवण्याच्या वेगवेगळया पद्धती व उपचार शिकवण्यासाठी वेगवेगळे कोर्सेस ही केले.

**५) झेप ही संस्था कशी सुरु झाली? संस्था सुरु करताना लागणारी जागा, भाग भांडवल दैनंदिन खर्च,... यांचा ताळमेळ कसा घालतात?**

स्वतःच्या मुलासाठी तंत्रशुद्ध संगोपनाची सोय तर झाली. परंतू अशी अनेक मुले या सेवेपासून वंचित असल्यामुळे त्यांच्या पालकांना असलेल्या अडचणी, प्रश्न व त्यांची मनस्थिती माझ्या लक्षात आली. पुण्यातील पिंपरी-चिंचवड या विभागात विशेष मुलांसाठी तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणारी एकही संस्था नसल्यामुळे मी सर्व प्रकारच्या विशेष मुलांसाठी संस्था सुरू करण्याचे ठरविले. पुरेश्या पाठबळा अभावी त्याविचारांना मुर्त स्वरुप येत नव्हते. याच सुमारास कुदळदेशकर गौड ब्राम्हण समाज (पुणे, पिंपरी-चिंचवड विभाग) ह्या ज्ञातीबांधवांचे काम करणाऱ्या संस्थेच्या संपर्कात मी आले. संस्थेचे पुणे विभागाचे अध्यक्ष श्री.पाटकर व कार्याध्यक्ष श्री. सुधीर सामंत यांच्याजवळ त्यांनी आपल्या मनातील विचार व अडचणी व्यक्त केल्या व तेथेच झेप या संस्थेचे बिज रोवले गेले.

त्यानंतर श्री. प्रभाकर पाटकर व श्री. सुधीर सामंत यांच्याशी चर्चा करून त्यांनी संस्थेला पूर्ण पाठिंबा देण्याचे ठरविले व त्यानंतर झेप पुनर्वसन संस्थेची स्थापना झाली.

एवढी लागोपाठ संकटे आली तरीही खंबीरपणे उभे रहाण्यासाठी नेहमी आधार देणारी सगळी चांगलीच माणसेभेटली. झेपचा सर्व दैंनदिन खर्च चालवण्यासाठी प्रत्येक मुलाकडून फि घेतली जाते, पण तरीही १० टक्के फि न देणाऱ्या मुलांनाही प्रवेश दिला जातो. त्यासाठी रोटरी क्लब, लायन्स क्लब, काही कंपन्या यांची मदत मिळते. सांगायला खूप अभिमान वाटतो की मी जातीयवादी नसले तरीही के.डी.जी.बि. हा आपल्या समाजातील प्रतिष्ठीत लोकांनीही आर्थिक वा मानसिक दोनही प्रकारे मला साथ देत आहेत. ह्यात उल्लेखकरण्यासारखे म्हणजे आपल्या समाजातील श्री.बा.पाटील यांनी त्यांच्या पत्नीच्या नावे दिलेली भली मोठी देणगी, तसेच नारायण पाटकर संस्थेकडून मिळालेली स्कूल बस, एकनाथ ठाकूर यांच्या कडून मिळालेली देणगी अश्या अनेक जणांची नावे सांगता येतील. लोकसत्ता सारख्या प्रसिध्द दैनीकातील सर्व ''सर्वकार्येषू सर्वदा'' सदरातून लोकसत्तेने झेपचे कार्य महाराष्ट्रात सर्व दूर पोहचवले. झी मराठीच्या होम मिनिस्टर या कार्यक्रमातूनही झेपची ओळख सर्व दूर झाली.

**६) सर्व सामान्यमाणसे धंदा, व्यवसाय, महिला गृह उद्योग, स्वयंरोजगार महिला बचत गट/योजना यावर कामकरून नफा कमविण्याचा विचार करतात.... आपण मात्र वेगळयाच न मळलेल्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न केलात... काय सांगाल?**

जन्माला येणारी प्रत्येक माणसं ही धंदा, व्यवसाय, महिला गृह उद्योग, बचत ग़ट यावर काम करुन नफा मिळवून स्वत:साठी व स्वत:च्या माणसांसाठी जगतात, पण जो माणुस स्वत:च्या माणसांसाठी जगून दुसऱ्यांसाठी जगतो तो खऱ्या अर्थाने जीवन जगतो. आपल्यासारखा जीवनाचा लढा लढण्याची परिस्तिथी ज्यांच्यावर आली आहे त्यांना आपल्या अनुभवाचा फायदा करून घ्यावा, त्यांना आधार द्यावा. तसेच स्वतः पालक असल्यामुळे विशेष मुलांच्या पालकांच्या मनस्थिती वा परिस्तिथीची जाणीव होती. त्या मुळे आपल्या विशेष मुलावर उपचार करून त्याला स्वावलंबी बनविण्यासाठी खंबीरपणे उभे राहण्यासाठी पालकांना आधार द्यावा अशी प्रबळ इच्छा होती.

**७) ही संस्था पुणे चिंचवड येथे मतीमंद, गतीमंद, स्वमग्न ता,अतिचंचल, अध्ययनक्षमता, अति क्रियाशील मुलांसाठी सुरु केलात.... त्यांची लक्षण व त्या मुलांविषयी थोडक्यात?**

झेप या केंद्रात खालील सर्व प्रकारच्या विशेष मुलांना प्रशिक्षण देण्यास सुरवात झाली - मेंदूचा पक्षाघात

(celebral palsy), मतिमंदत्व (Mental retardation), उशिरा होणारा शारिरीक वा मानसिक विकास (Developmental delays), अनुवंशिक आजार (Genetic disorder), डाऊन सिन्ड्रोम (Down Syndrom), स्वमग्नता (utism), पर्वेझीव डेव्हलपमेंटल डीसऑर्डर (Pervasive developmental disorder), अतिचंचल (Hyperactive), अध्ययन क्षमता (learning disability), अतिक्रियाशील (D.H.D.) यासंस्थेमध्ये आहेत. पिंपरी-चिंचवड वा आजूबाजूच्या परिसरात अश्या सर्व प्रकारच्या विशेष मुलांना एकाछताखाली सर्वप्रकारचे प्रशिक्षण वा उपचार देणारी एकही संस्था नव्हती. झेप ही एकमेव अशी संस्था आहे जी पिंपरी-चिंचवड मध्ये कार्यरत आहे व या संस्थेत सध्या पंच्याण्णवहून अधिक मुले-मुली आहेत. जागेच्या अभावी ५० हून अधिक मुले प्रवेशासाठी प्रतीक्षा यादीत आहेत. प्रत्येक मुल हे वेगळे असून त्यांच्या समस्या वेगळ्या असतात. त्याप्रमाणे त्यांच्यावरील उपचार पद्धतीसुद्धा वेगळ्या असतात. या संस्थेत या मुलांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र उपचारतज्ञ आहेत. प्रत्येक विशेष मुलाला कित्येकदा दिवसभरात कराव्या लागणाऱ्या अत्यंत आवश्यक गोष्टीसुद्धा कुणाच्या मदतीशिवाय करता येत नाहीत अश्यावेळी त्यांच्या मधील अवस्था (Disorder) ओळखून विशेष कार्यक्रम पद्धती द्वारा उपचार तज्ञ त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक विध्यार्थी वेगळेपणावर मातकरून आजच्या स्पर्धेच्या युगात मुलाचा सर्वांगीण विकास करून आत्मविश्वासाने स्वतःच्या पायावर उभे राहण्यास त्यास मदत करणे हे झेपचे उद्दिष्ट आहे. १८ वर्षा वरील मुलाचे सामाजिक वा आर्थिक दृष्ट्या पुनर्वसन करताना त्याच्या कौशल्याचा वापर केला जातो. त्यांना रिकामे ठेवले तर त्यांच्या समस्या वाढतात, त्यामुळे त्यांना गुंतवून ठेवणे व स्वावलंबी बनविणे यासाठी झेप मध्ये मुलांना पणत्या बनविणे, कागदी पिशव्या बनविणे, कापडी फुले बनविणे, तोरण बनविणे, वाती, हार, उदबत्ती बनविणे इत्यादी कामे शिकवली जातात वा त्याच्यासाठी बाजारपेठ मिळविण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो. झेप या संस्थेत मुलांना एका छताखाली त्यांच्यासाठी लागणाऱ्या सर्व उपचार पद्धती वा त्याची साधने उपलब्ध आहेत. झेप संस्थेत प्रवेश घेण्यासाठी आर्थिक कमतरता असणे अथवा (toilet training) नसणे हा निकष ठरत नाही, सर्वांना प्रवेश दिला जातो. झेप संस्थेच्या पुढे स्वतःच्या जागा नसणे, शैक्षणिक साधने व थेरपीच्या साधनांची कमतरता असणे, थेरपिस्ट वा डॉक्टरांना बोलावून त्यांची फि देण्यासाठी आर्थिक कमतरता भासणे अशी काही आव्हाने आहेत, त्यातून मार्ग काढून झेप संस्था सर्वांच्या मदतीने पुढे चालली आहे, चांगले काम सुरु झाले की अपोआप अनुभवाचे व मदतीचे हात पुढे येतात. विशेष मुलांचे पुनर्वसन न म्हणता वसन करणे म्हणणेच योग्य होईल. तर असे वसन करण्यासाठी समाजाचा सपोर्ट ग्रुप उभा राहिला पाहिजे. तरच विशेष मुले वा त्यांचे पालक चारचौघां सारखे आयुष्य जगू शकतील.

**८) अशा प्रकारच्या विशेष मुलांचे संगोपन, त्यांच्यात आत्मविश्वास, त्यांना सतत गुंतवून ठेवणे व स्वावलंबी बनविणे यासाठी आपली संस्था कशा प्रकारे काम करते? आपल्या संस्थेची थोडक्यात कार्यपद्धती व कर्मचारी मनुष्यबळ इ. विषयी....**

झेप पुनर्वसन केंद्र, ही संस्था सन २००८ मध्ये २ शिक्षक व १० मुले यांना घेऊन सुरु झाली. यावर्षी संस्थेत९३ विशेष मुले, २५ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ५ थेरपिस्ट आहेत. सदर संस्था ही भाड्याच्या जागेत कार्यरत आहे. संस्था देणगी व मुलांची फीज यावर चालली आहे. संस्थेची जागा मर्यादित असल्यामुळे आणखी विशेष मुलांना संस्थेत प्रवेशासाठी प्रतिक्षा करावी लागत आहे. मुलांच्या गरजा लक्षात घेऊन मुलांना फिजिओ थेरपी, ऑक्युपेशनल थेरपी, बिहेविअर थेरपी, स्पीच वव्हिजन थेरपी दिली जाते. त्याच प्रमाणे शैक्षणिक अभ्यासक्रम हा प्रत्येक मुलानुसार वेगळा असतो त्यानुसार मुलांचा वैयक्तिक अभ्यास क्रम तयार केला जातो. यामध्ये दैनंदिन जीवनातील उपयुक्त गोष्टी प्रत्येक मुलाच्या गरजेनुसार मुलांना शिकवल्या जातात (Daily living activity). अध्ययन अक्षम मुलांना देखील स्वतंत्रपणे शिकवले जाते. 'डिजिटल झेप' हे संस्थेचे ध्येय असुन त्याप्रमाणे मुलांना कॉम्पुटर ट्रेनिंग दिले जात आहे. संस्थेमध्ये पालकांसाठी व मुलांसाठी उपयुक्त अशा कार्यशाळा घेतल्या जातात, पालकांसाठी विविध

मनोरंजनाचे कार्यक्रम, पालक व मुलांसाठी सहल, तसेच पालकांसाठी सहविचार सभांचे आयोजन केले जाते. प्रत्येक पालकांना वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन केले जाते. विशेष मुलांना संस्थेत वेगवेगळ्या activity शिकवुन त्यांना सतत कार्यरत ठेवले जाते. तसे पालकांना देखील मार्गदर्शन केले जाते. संस्थेमध्ये कार्यानुभव अंतर्गत भाजी निवडणे, बागकाम, खत तयार करणे, सरबत बनवणे, भेळ बनवणे, आवश्यक असे उपक्रम घेतले जातात. फायरलेस स्वयंपाकातील पदार्थ बनवायला शिकवले जाते. तसेच भविष्यात विशेष मुल स्वावलंबी होण्यासाठी त्याला 'व्यावसायिक प्रशिक्षण' दिले जाते. यामध्ये पेपर बॅग, पाकीटे बनवणे, अरगुंडीची फुले व त्याचे बुके बनवणे, राखी बनवणे, दिवाळीत पणत्या रंगवणे, फिनेल व लिक्विड सोप बनवणे, मोत्यांचे हार तयार करणे. अशा प्रकारचे प्रशिक्षण त्यावेळेस असणाऱ्या सणानुसार व मागणीनुसार दिले जाते. प्रत्येक मुलाचे मूल्यमापन करून याचा वैयक्तिक अभ्यासक्रम बनविला जातो, अश्या प्रशिक्षणातून पुढे जाऊन ५ मुले सामान्य मुलांच्या शाळेत एकत्रित होऊन शिक्षण घेत आहेत. तसेच १८ वर्षा वरील ४ मुलांना नोकरी लावून त्यांचे पुनर्वसन केले आहे.

**९) आज झेप संस्था सुरु करून किती वर्ष झालीत? प्रेयसला संभाळताना तुम्ही समाजातील मुलांना सुद्धा कुशीत घेतलेत.... त्यांना आईची ममता दिलीत.... अशी किती मुले या संस्थेमध्ये आहेत?**

२००८ मध्ये १० मुले व २ शिक्षक घेवून झेप सुरु झाली. झेपमध्ये आलेले प्रत्येक मुल वेगळे असते, त्यामुलांना प्रशिक्षण देताना प्रत्येक मुलाचा अभ्यास करून त्याची आई व्हावे लागते. या मुलांना येणाऱ्या सामाजिक स्तरावरील व शैक्षणिक स्तरावरील अडचणीतून मार्ग काढण्यासाठी वेगवेगळे उपचार केले. त्यावेळी आलेले काही अनुभव सांगते. वेदांत शाळेत आला तेव्हा ५ किंवा साडे पाचवर्षांचा होता. एका पायावर गिरकी घेऊन वाऱ्याच्या वेगाने जोरात किंचाळत धावणारा वेदांत एका जागेवर बसुन अभ्यासच काय पण तो हाताने खाणे, स्वतःचे स्वत: दैनंदिन जीवनातील गोष्टी ही करत नव्हता. प्रशिक्षणानंतर ५ मिनीटे, १० मिनीटे करत करत अभ्यासाला बसायची सुरुवात झाली. आणि बघता बघता वेंदात इतका बदलत गेला कि सामान्य मुलांच्या शाळेत सामान्य मुलांसोबत ४ ते ५ तास बसुन नियमीत अभ्यास करु लागला. शाळे नंतर वेदांत पुन्हा झेप सेंटरमध्ये यायचा आणि आम्हा सर्वांचीच परत शाळा भरवायचा क्रमाने हजेरी घेणे. A to Z न अल्फाबेट म्हणणे, पाढे म्हणुन घेणे. हाच वेदांत आता झेपच्या मदतीं शिवाय सामान्य मुलांच्या शाळेत ७ वी च्या वर्गात शिकत आहे.

सुश्रुत तर शाळेत आला तेव्हा खुप लहान होता. वर्गात बसणं तर लांबच, गेट च्या आत आला तरी रडायला लागायचा. सुरुवातीला बाहेर बसुनच सुश्रुतशी मैत्री केली, पायरी वर बसुन अभ्यासाला सुरुवात झाली. रोज एक एक पायरी वर चढत हळुहळु वर्गात प्रवेश केला. परत त्याला त्याचा वर्ग बदूललेला चालत नसायचा. मग काय पुन्हा सगळ्या शाळेची, वर्गाची सवय होण्यासाठी प्रयत्न केले. आता सुश्रुत गाण्यांच्या/ खेळाच्या स्पर्धेत भाग घेऊन बक्षीसही मिळवतो, सर्वांशी मिसळून दंगा मस्ती सोबत अभ्यासही करतो.अश्विथ चे आई बाबा शाळेत प्रवेश घेण्यासाठी आले. ऑफ़िस मध्ये बसुन प्रवेशाबाबतची बोलणी सुरु होती, अश्विथची धावाधाव, उंचावरुन उडी मारण पाहून काळजाचा ठोका चुकला. एकदा वाटल जमेल ना आपल्याला, पण परत दुसऱ्याच क्षणाला मनात विचार आला. मी जर नाही म्हणाले तर त्या पालकांनी काय करायच? कुठे जायचे? मग अश्विथला शाळा मिळणारच नाही का? कारण त्या वेळी पिंपरी चिंचवड मध्ये अशा मुलांसाठी शाळाच नव्हती, आणि मग रोज पुण्याला जाणे येणे शक्य नव्हते. मग काय अश्विथ शाळेत यायला लागला, एका जागेवर बसुन एक छोटी अक्टीव्हीटी करुन घ्यायची परत थोड फिरवुन आणायचे असे करत अश्विथला एका जागी बसायला शिकवले. अश्विथचे वय पहाता त्याला घरकाम करणे शिकवायला सुरु केले. अश्विथ आता आईला किचन मध्ये स्वंयपाकात तर मदत करतोय, तसेच घरातील झाड लोट, लादी पुसणे हि कामे सुध्दा व्यवस्थीत करतो. बाबु (कौशिक) नावा प्रमाणेच लाडाचा बाबु शाळेत आला तेव्हा एका जागी बसणे आणि सलील कुलकर्णी ची आयुष्यावर बोलु काहीची गाणी एकणे या पलीकडे काहीच करत नव्हता. प्रशिक्षणा नंतर बाबु स्वत:ची पॅण्ट काढुन शु

शी ला जाणे, हाताने जेवण करणे. हव्या असणाऱ्या खेळण्यांकडे हाताला धरुन ओढत नेणे शिकला. बाबु सारखी अतिंतिव्र स्वमंगता असलेली मुल, वेदांत आणि सुश्रुत सारखी DHD असणारी मुल किंवा अश्विथ सारखी खुप हायपर असणारी मुल काय, अशी वेगवेगळ्या गटातील प्रकारातील ९५ मुले झेप संस्थेत सध्या प्रशिक्षण घेत आहेत.अश्या प्रकारे सर्व मुलांना आईच्या मायेने समजून घेवून स्वावलंबी बनविण्याचे काम झेपची टीम करत आहे.

**१०) प्रेयस साठी सुरु केलेल्या संघर्षाचे रुपांतर आज झेप सारख्या यशस्वी संस्थेत झाले आहे? ज्याचा फायदा शेकडो मुलांनी घेतला आहे आणि समाजातील अशी असंख्य मुले जागे अभावी प्रतीक्षेत सुद्धा आहे... झेपची भविष्यातील योजना विषयी?**

**संस्था भविष्यकाळातील योजना–**

झेप संस्था भाड्याच्या जागेमध्ये सुरु आहे. संस्थेला 'स्वत:ची जागा' मिळावी, जेणेकरुन प्रवेशाच्या प्रतिक्षेत असलेल्या सर्वांना संस्थेत प्रवेश मिळेल. विशेष मुलांना स्वावलंबी करण्यासाठी 'व्यावसायिक प्रशिक्षण' केंद्र सुरु करावयाचे आहे. आपल्यानंतर आपल्या मुलाचे काय होईल? कोण काळजी घेईल्? हा पालकांना असणारा प्रश्न.... ! त्यासाठी विशेष मुलांसाठी 'निवासी शाळा' सुरु करावयाची आहे.

**११) संस्था चालवताना अनेक बरे वाईट प्रसंग अनुभवांना तोंड द्यावे लागते. तसेच आपल्याला काही आलेले अनुभव विषयी. ...**

**झेप व तुमच्या कार्याचा गौरव व दखल अनेक नामांकित वृत्तपत्र, मासिके संस्थांनी घेतलीच व अनेक पुरुस्काराने सन्मानित झालेल्या आहात...तुम्ही आनंदी आहात का?**

दहा वर्षापूर्वी संस्था चालू केली. प्रत्येक नवीन काम चालू केले की बरे वाईट अनुभव येतच असतात. मला वाटते चांगले काम असले की मदत करणारे अनेक हात पुढे येतात. झेपला नेहमीच मदत करणाऱ्यांची संख्या वाढत जात आहे. पाच वर्षापूर्वी प्रसिध्द दैनिक लोकसत्ताने संस्थेच्या कामावर विश्वास दाखवला, त्यामुळे संस्थेचे कार्य पूर्ण महाराष्ट्रात पोहोचले, कार्याला ओळख मिळाली वा हितचिंतक व देणगीदारांची संख्या वाढली. झी मराठीच्या होम मिनिस्टरमुळे झेपचे काम व कीर्ती सर्वदूर पोहचली. हितचिंतकाबरोबरच लांबलांबचे पालक मार्गदर्शनासाठी येऊ लागले. झेपला जागेचा प्रश्न आहेच, पण त्यातून मार्ग काढून संस्था पुढे चालली आहे. मी सगळ्या ज्ञाती बांधव व समाजाला उद्देशून म्हणेन पाठीवरती हात ठेवूनी सदैव लढ म्हणा.

पुरस्कार मिळणे म्हणजे समाजाने काम स्वीकारल्याची पावती आहे. जेवढे पुरस्कार जास्त तेवढी जबाबदारी वाढते. झेपचे कार्य हे टीमवर्क आहे. असेच सर्वांच्या सहकार्याने झेपचे कार्य पुढे जाईल वा गेले पाहिजे. जास्तीत जास्त विशेष मुले व त्यांच्या पालकांना झेपमधून आधार मिळावा ही इच्छा.

**१२) कु. दे. गौ. ब्रा. समाजातील आमच्या ज्ञातीबांधवांना व तरुणांना आपल्या खडतर जीवन व कठीण परिस्थितीशी झुंज देऊन यशाचे शिखर गाठायचे असेल तर काय संदेश दयाल.**

वेगवेगळ्या माध्य्माद्वारे आपण ऐकतो की वेगवेगळ्या संकटाशी मुकाबला करून स्त्रिया जिद्दीने उभ्या राहतात. आपल्या कुटुंबाला खंबीरपणे साथ देतात वा आयुष्यात यशस्वी वा कर्तबगार बनतात. अशी अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत. संकटाचे संधीत रुपांतर करून जिद्दीने पुढे जाणे हेच आयुष्य आहे.

आत्ताच्या ह्या कॉम्पुटर व इंटरनेटच्या युगामध्ये ज्ञानाचे व माहितीचे प्रचंड भांडार आपल्या समोर खुले आहे. आपल्या आवडीप्रमाणे आपण जर त्यात मेहनत पूर्वक सातत्य ठेऊन लक्ष घातल्यास कोणतेही काम आता अशक्य नाही. आपली जिज्ञासा मात्र सतत जागृत ठेवणे गरजेचे आहे.

**१३) झेप हे नुसते स्वप्न नसून जिवंत संस्था आहे त्याला प्रचंड आर्थिक पाठबळाची गरज तर आहेच परंतु मनुष्यबळ सुद्धा महत्त्वाचे आहे. ज्ञातीबांधवांना कशा प्रकारे झेपला मदतीचे आव्हान कराल. ( I/T BENEFIT आहे का?)**

मनुष्य जन्माला येऊन आपण एक सामाजाचे देणे लागतो ही भावना असणे फार महत्वाचे आहे. १० वर्षापूर्वी

झेप या संस्थेचा जन्म झाला, त्याला मोठे करण्यासाठी आत्तापर्यंत अनेक लोकांचे/संस्थांचे आर्थिक तसेच वैयक्तिक मदतीचे सहकार्य लाभले. आपण ज्या समाजात जन्माला आलो त्या समाजाला आपल्या बद्दल आपुलकी असते आणि अपेक्षा सुध्दा असते. आपली ज्ञाती संस्था बहुतेक सर्व मोठ्या शहरांमधून काम करत आहे. ह्या संस्था म्हणजे आपले एक मोठे कुटुंबच आहे आणि या मध्ये माझ्या सारखे अनेक जण विशेष काम करण्यासाठी धडपडत असतात आणि ह्याची दखल आपल्या कुटुंबाने घेतल्यास ते काम करण्याची हिम्मत वाढते व अधिक जोमाने ते काम केले जाते.

अश्या कामांना जर संस्था मदत करणार असेल तर माझ्या मते ह्या कामासाठी एका वेगळ्या गटाची स्थापना करावी की जे अश्या प्रकारच्या संस्थाना भेट देऊन, त्यांच्या गरजा लक्षात घेऊन त्या संस्थेला मदत करतील. आत्ता पर्यंत आपल्या ज्ञातीतील वेगवेगळ्या संस्था वा व्यक्तीशः भरभरून मदत केली आहे.

गौड ब्राह्मण सभे तर्फे आम्ही असे आव्हान करतो कि ''झेप'' ला मदत करण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधणे. सदर संस्थेला आर्थिक मदत केल्यावर उत्पान्नातून कर सवलत U/S - 80G INCOME TAX ACT 1961 अंतर्गत मिळेल.